MHYA070018252015

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १५/०१/२०१५ |
| नोंदणी दिनांक | : | १५/०१/२०१५ |
| निकाल दिनांक | : | १५/०४/२०२६ |
| कालावधी | : | ११ वर्ष ३ महिना ०० दिवस |

# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र. २), दारव्हा, जि. यवतमाळ यांचे न्यायालय

(पीठासीन अधिकारी श्री. निलेश ल. पाटील)

**(पारित दिनांक १५ एप्रिल, २०२६)**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.५८/२०१५**

**गुन्हा रजिस्टर क्र. २६९/२०१३ (दारव्हा पो. स्टे.)**

**निशाणी क्र.२१**

**अभियोग पक्ष** :

महाराष्ट्र सरकार, तर्फे

पोलीस ठाणे अधिकारी दारव्हा,

ता. दारव्हा, जि. यवतमाळ.

**सरकारतर्फे**:

**श्री. सी. बी. उके,**

**विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

**.. विरुध्द..**

**आरोपी :**

**अंबु रोडबा जाधव**

**वय** – ३९ वर्षे, **व्यवसाय** – चालक,

रा. गौळपेंड, ता. दारव्हा, जि. यवतमाळ

**आरोपीतर्फे** : **विधीज्ञ श्री एस.बी.ऊके**

# न्या य नि र्ण य

१.

| | |
|---|---|
| **अपराध घडल्याचा दिनांक** | १६/१२/२०१३ |
| **प्रथम खबर दिनांक** | १६/१२/२०१३ |
| **दोषारोप दाखल केल्याचा दिनांक** | ३१/१२/२०१४ |
| **दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक** | ११/११/२०२२ |
| **पुरावा नोंदविण्यास सुरुवात केल्याचा दिनांक** | ०८/१२/२०२२ |
| **न्यायनिर्णयासाठी ठेवल्याचा दिनांक** | निरंक |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १५/०४/२०१६ |
| **शिक्षेच्या आदेशाची तारीख असल्यास.** | लागु नाही. |

## २. आरोपीचा तपशील :

| आरोपींची रँक | आरोपींचे नावे | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचा तपशील | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षा कालावधी | खटला चालू असल्याच्या दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी, फौ.प्र.सं. कलम ४२८ साठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | अंबु रोडबा जाधव | आरोपीस दिनांक २२/०१/२०१४ रोजी अटक केली. | आरोपीस दिनांक २२/०१/२०१४ रोजी जामीनावर सोडले. | भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) अन्वेय | निर्दोष | निरंक | लागू नाही |

**३–अभियोग पक्षाचे साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाचे साक्षीदार**

**असल्यास:**

**अ:– अभियोग पक्षाचे साक्षीदार:**

| रँक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| **सा. क्र. १/ नि. क्र. १०** | कैलास बाबुसिंग राठोड | साक्षीदार |
| **सा. क्र. २/ नि. क्र. १०** | विजय ज्ञानेश्वर कुऱ्हाडे | साक्षीदार |
| **सा. क्र. ३/ नि. क्र. १०** | रामप्रभु धोंडबाजी वाघमारे | फिर्यादी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार** : आरोपीने पुरावा दिला नाही.

**क. न्यायालयीन साक्षीदार** : निरंक.

**४. अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचे दस्तास निशाणी बाबत यादी** :

अ. **अभियोग पक्षाचे निशाणी** :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| **१** | नि.क्र.१८/ सा. क्र. ३ | फिर्यादीवर सही |
| २ | नि.क्र.१९/ सा. क्र. ३ | प्रथम खबर अहवालावरील सही |

**ब. बचाव पक्षाचे निशाणी** : निरंक.

**क. न्यायालयाची निशाणी**: निरंक.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| **१** | नि. क्र.१० | दोषारोप |

**ड. विशेष साहित्य (मटेरियल ऑब्जेक्ट)**: निरंक.

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) अन्वये दोषारोप पत्र दाखल केले आहे.

## अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे

**०२.** प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, दिनांक १६/१२/२०१३ रोजी सायंकाळी ४.३० वाजता फिर्यादीचा चुलत भाऊ गजानन वाघमारे, व त्याची पत्नी ललीता वाघमारे, व त्याचा मित्र प्रमोद सुरजुसे व कार्तीक बुटले असे संतोष सोनोने याची मोटार सायकल क्र. MH–29–AF–1179 वर बसुन लिंगी सायखेडा येथे जात असतांना आरोपीने चारचाकी गाडी क्र. MH–38–4742 ही अविचाराने, भरधाव वेगात, बेदरकारपणे व निष्काळजीपणाने चालवुन त्यामध्ये प्रमोद मारोतराव सुरजुसे व कार्तीक बुटले यांला गंभीर मार लागुन जखमी झाले व गजानन काशिनाथ वाघमारे व सौ. ललीता गजानन वाघमारे हे मरण पावले. म्हणुनच प्रस्तुतची फिर्याद आरोपीच्या विरुध्द पोलीस स्टेशन दारव्हा येथे दिली.

**०३.** सदर फिर्यादवरुन लाडखेड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. २६९/२०१३ हा भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधिकारी अशोक डोंगरे दारव्हा पोलीस स्टेशन यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, प्रस्तुत गुन्हया संर्दभातील वाहनाची कागदपत्रे हस्तागत केले, साक्षीदारांचे जबाब नोंदवले, आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा

मिळून आल्याने त्यांनी आरोपी विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** माझ्या पुर्वीचे पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयांचा दोषारोप निशाणी क्र. १० वर निश्चीत केला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन करुन संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि दोषारोप पाहता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले. त्या प्रत्येक मुद्दयांचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्यांची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१** | अभियोग पक्षाने सिध्द् केले काय की, दिनांक १६/१२/२०१३ रोजी सायंकाळी ४.३० वाजता फिर्यादीचा चुलत भाऊ गजानन वाघमारे, त्याची पत्नी ललीता वाघमारे, त्याचा मित्र प्रमोद सुरजुसे व कार्तीक बुटले असे संतोष सोनोने याची मोटार सायकल क्र. MH-29-AF-1179 वर बसुन लिंगी सायखेडा येथे जात असतांना आरोपीने चारचाकी गाडी क्र. MH-38-4742 ही अविचाराने, भरधाव वेगात, बेदरकारपणे व निष्काळजीपणाने चालवुन त्यामध्ये प्रमोद मारोतराव | नाही |

| | | |
|---|---|---|
| | सुरजुसे व कार्तीक बुटले यांला गंभीर मार लागुन जखमी झाले व गजानन काशिनाथ वाघमारे व सौ. ललीता गजानन वाघमारे हे मरण पावले? | |
| २ | कोणता आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## – : कारणमिमांसा :–

## मुद्दा क्र. १

**०६.** फिर्यादी पक्षाचे म्हणणे असे आहे की, दिनांक १६/१२/२०१३ रोजी सायंकाळी ४.३० वाजता फिर्यादीचा चुलत भाऊ गजानन वाघमारे, त्याची पत्नी ललीता वाघमारे, त्याचा मित्र प्रमोद सुरजुसे व कार्तीक बुटले असे संतोष सोनोने याची मोटार सायकल क्र. MH–29–AF–1179 वर बसुन लिंगी सायखेडा येथे जात असतांना आरोपीने चारचाकी गाडी क्र. MH–38–4742 ही अविचाराने, भरधाव वेगात, बेदरकारपणे व निष्काळजीपणाने चालवुन त्यामध्ये प्रमोद मारोतराव सुरजुसे व कार्तीक बुटले यांला गंभीर मार लागुन जखमी झाले व गजानन काशिनाथ वाघमारे व सौ. ललीता गजानन वाघमारे हे मरण पावले. सदर बाब सिद्ध करण्यासाठी फिर्यादी पक्षाने साक्षीदार क्र.१ कैलास बाबुसिंग राठोड(साक्षीदार), साक्षीदार क्र.२ विजय ज्ञानेश्वर कुऱ्हाउे (साक्षीदार), साक्षीदार क्र. ३ रामप्रभु धोंडबाजी वाघमारे (फिर्यादी) या प्रत्यक्ष साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

**०७.** अभियोग पक्षाने त्यांचे कथन सिध्द करण्यासाठी घटनास्थळ पंच गजानन पुंडलीक कदम मयत असल्यामुळे त्याची साक्ष नोंदविली नसुन व इतर साक्षीदार तपासी अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांची सुध्दा साक्ष नोंदविण्यात आली नाही.

**०८.** सदर घटनेतील साक्षीदार क्र.१ कैलास बाबुसिंग राठोड (साक्षीदार), साक्षीदार क्र. २ विजय ज्ञानेश्वर कुऱ्हाडे यांने त्यांच्या साक्षीत कथन केले की, घटना केव्हा घडली हे त्यांना माहिती नसल्याचे सांगितले. तसेच एका मोटर सायकलचा व बोलेरो गाडीचा तरोडा ते लाख येथील संजय मादनकर यांच्या शेताजवळ दिनांक १६/१२/२०१३ रोजी संध्याकाळी ५.३० वाजताच्या सुमारास अपघात झाला व त्या अपघातामध्ये एक पती व पत्नीचा मृत्यु पावले असे काहीही घडले नसल्याचे कथन केले. ते विजय कुऱ्हाडे यांच्या गाडीवर बसुन लाख खिंड येथे जात होते व अपघात प्रत्यक्ष पाहाला नसल्याचे कथन केले. तसेच प्रस्तुत साक्षीदारांने सहकार्य केले नसल्यामुळे सरकारी अभियोक्ताने सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली व पुढे उलटतपास घेण्यात आला असता त्याला विचारण्यात आलेले संपुर्ण कथन त्याने नाकारले.

**०९.** साक्षीदार क्र.३ रामप्रभु धोंडबाजी वाघमारे (फिर्यादी) याने त्याच्या साक्षीत कथन केले की, तो आरोपीला ओळखत नसुन घटना काय घडली हे त्याला माहिती नसल्याचे कथन केले. पुढे असे कथन केले की, मृतक गजानन काशिनाथ वाघमारे व त्याची पत्नी ललीता गजानन वाघमारे हे त्याचे नातेवाईक लागत असुन तो इतर जखमींना ओळखत नसल्याचे कथन केले व अपघात कसा घडला हे त्याला माहिती नसल्याचे देखील त्याने

कथन केले. त्याला तक्रार देण्याकरीता सांगितले म्हणुन त्याने तक्रार दिली असल्याचे सांगितले. त्याने दिलेली तक्रार त्याला दाखविण्यात आली असता त्यावरील सही त्याचीच असल्याचे कथन केले. परंतु पुढे असेही कथन केले की, त्यातील मजकुर काय नमुद केला आहे हे त्याला माहिती नाही. प्रस्तुत साक्षीदार सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी अभियोक्त्यांनी उलटतपास करण्याची परवानगी मागितली व न्यायालयाने परवानगी दिली असता त्याचा उलटतपास घेण्यात आला तेव्हा त्याने मान्य केले की, त्यांच्या गावातील सरपंच सुरजुसे यांनी गजानन, ललीता, प्रमोद, आणि कार्तीक यांच्या वाहनाचा अपघात झाला अशी सुचना दिली होती. गजानन आणि ललीता हे जागीच मरण पावले व प्रमोद आणि कार्तीक यांना सरकारी रुग्णालय दारव्हा येथे घेऊन गेल्याची माहिती मिळाली व तो तिथे पोहोचला व ललीता आणि गजानन यांचे प्रेत त्याठिकाणी आणले व प्रमोदला डोक्याला मार लागला होता व कार्तीक याला पायाला मार लागला असल्याची माहिती त्याला मिळाली. त्याला सरपंचाकडुन माहिती मिळाल्यानंतर तो त्या ठिकाणी पोहोचला असता त्याला त्या ठिकाणी ललीता आणि गजानन यांचे प्रेत आणलेले दिसले. तसेच प्रमोद याच्या डोक्याला मार लागला असुन कार्तीक याच्या पायाला मार लागला असल्याचे त्याला दिसले असल्याचे कथन केले. अपघात चारचाकी वाहनाने त्यांची दुचाकी वाहनाला दारव्हा दिग्रस रस्त्यावर मादनकर याच्या शेताजवळ धडक दिल्यामुळे झाला असल्याची तक्रार त्याने दिली असल्याचे मान्य केले. तसेच सदर घटनेत पोलीसांनी त्याचे बयाण नोंदविले नसल्याचे मान्य केले.

**१०.** सदर घटनेतील घटनास्थळ पंच व तपासी अधिकारी यांची साक्ष अभिलेखावर आलेली नाही. तसेच साक्षीदार क्र. ३ रामप्रभु धोंडबाजी वाघमारे यांच्या गावातील सरपंच सुरजुसे यांनी गजानन, ललीता, प्रमोद, आणि कार्तीक यांच्या वाहनाचा अपघात झाला अशी सुचना दिली होती व गजानन व ललीता हे जागीच मरण पावले व प्रमोद आणि कार्तीक यांना सरकारी रुग्णालय दारव्हा येथे घेऊन गेल्याची माहिती मिळाली व तो तिथे पोहोचला व ललीता आणि गजानन यांचे प्रेत त्याठिकाणी आणले व प्रमोदला डोक्याला मार लागला होता व कार्तीक याला पायाला मार लागता होता. त्यांचा अपघात चारचाकी वाहनाने त्याच्या दुचाकीला धडक दिल्यामुळे झाला असे पुराव्यात कथन केले. तथापी, सदर साक्षीदारानेही अपघात करणाऱ्या वाहनाचा क्रमांक काय होता कोण वाहण चालवित होता हे त्याने त्याच्या साक्षीत सांगितलेले नाही. तसेच त्याच्या साक्षीतुन आरोपीने सदरचे वाहन निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालविले होते, याबाबत काहीएक सांगीतले नाही तसेच अभिलेखावर त्याच्याकडुन कोणतेही सबळ पुरावा आला नाही.

**११.** प्रस्तुत प्रकरणातील साक्षीपुराव्याचा विचार करता साक्षीदार क्र.१ व साक्षीदार क्र.२ यांनी आपल्या साक्षीत अपघातात कोणत्या जखमीचा मृत्यू झाला व कोणत्या गाडीने मार लागला तसेच वाहण चालविणारा व्यक्ती किंवा आरोपी कोण होता याबाबत स्पष्टपणे काहीही सांगितले नसल्याचे दिसून येते. मयत व्यक्तींच्या दुखापतीबाबतचा तपशील ही महत्त्वाची व मूलभूत बाब मानली जाते. मयत गजानन काशिनाथ वाघमारे व ललीता काशिनाथ वाघमारे यांचे नाव सांगितलेले नसुन ते साक्षीदार असल्यामुळे त्यास

अपघातातील दुखापतीबाबत अचूक माहिती व तसेच ज्या वाहनाने धडक दिली तिचा नंबर सांगणे महत्वाचे होते. तथापी, सदरप्रमाणे तिनही साक्षीदारांच्या साक्षीत असलेली विसंगती ही लक्षणीय असून ती त्यांच्या साक्षीच्या विश्वासार्हतेवर शंका निर्माण करणारी आहे. विशेषत: साक्षीदार क्र. ३.

**१२.** प्रस्तुत प्रकरणात हेही लक्षात घेण्यासारखे आहे की, घटनास्थळ पंच व इतर साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर आली नाही व तसेच वैद्यकीय अधिकारी व तपासी अधिकारी यांची साक्ष सुध्दा अभिलेखावर आलेली नाही. तसेच अपघात करणाऱ्या वाहनाचा क्रमांक कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारास माहिती नसल्याचे त्यांच्या साक्षीतून स्पष्ट होते. परिणामी तपासादरम्यान केलेल्या कार्यवाहीबाबत न्यायालयासमोर स्पष्ट पुरावा उपलब्ध नाही.

**१३.** भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) अंतर्गत दोष सिद्ध करण्यासाठी आरोपीने दिनांक १६/१२/२०१३ रोजी सायंकाळी ४.३० वाजता फिर्यादीचा चुलत भाऊ गजानन वाघमारे, व त्याची पत्नी ललीता वाघमारे, व त्याचा मित्र प्रमोद सुरजुसे व कार्तीक बुटले असे संतोष सोनोने याची मोटार सायकल क्र. MH–29–AF–1179 वर बसुन लिंगी सायखेडा येथे जात असतांना आरोपीने चारचाकी गाडी क्र. MH–38–4742 ही अविचाराने, भरधाव वेगात, बेदरकारपणे व निष्काळजीपणाने चालवुन त्यामध्ये प्रमोद मारोतराव सुरजुसे व कार्तीक बुटले यांला गंभीर मार लागुन जखमी झाले तसेच गजानन काशिनाथ वाघमारे व सौ. ललीता गजानन वाघमारे हे मरण

पावले, हे संशयापलीकडे जावुन सिद्ध होणे आवश्यक आहे. तसेच घडलेल्या अपघातामध्ये आरोपीचे वाहन क्रमांक व आरोपीच वाहन चालवित होता किंवा कसे हे अभिलेखावर आलेले नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध साक्षीपुराव्याच्या आधारे आरोपीने वाहन निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालविले होते, ही बाब संशयापलीकडे जावुन सिद्ध झाली नाही. त्यामुळे, उपलब्ध पुराव्याच्या आधारे अभियोग पक्ष आरोपीविरुद्धचा आरोप संशयापलीकडे जावुन सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे. परिणामी, मी मुद्दा क्र. १ याचे उत्तर **नकारार्थी** देण्यात येते.

**मुद्दा क्र. २ बाबत**:

**१४.** मुद्दा क्र. १ याची उत्तर नकारार्थी आल्याने आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होणार आहे. प्रस्तुत गुन्हयाच्या तपासाकामी जप्त असलेला मुद्देमाल अपील कालावधी नंतर कायदेशार मार्गाने त्याची विल्हेवाट लावावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आ दे श**

१. आरोपी **अंबु रोडबा जाधव** याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) नुसार भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) अंतर्गत असलेल्या गुन्हयामधून **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. आरोपीने दिलेले जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अंतर्गत सहा महिन्याच्या कालावधीकरीता रक्कम रु. २५,०००/– चे जातमुचलक्याचे बंधपत्र द्यावे व सदर सहा महीनाचा कालावधी संपल्यानंतर त्यांचे बंधपत्र रद्द होवून आरोपीस पुर्णतः मुक्त करण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

NILESH LAXMANRAO PATIL
Digitally signed by NILESH LAXMANRAO PATIL
Date: 2026.04.15 15:18:32 +0530

**दिनांक –१५/०४/२०२६** **(निलेश ल. पाटील)**

**ठिकाण –** दारव्हा, जि. यवतमाळ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय. क्र.२), दारव्हा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | **:-** | Mrs. D.R.Gaikwad<br>Stenographer (Grade 3) |
| **Court Name** | **:-** | 2nd Jt. CJJD Darwha |
| **Date** | **:-** | 15/04/2026 |
| **Judgment signed by presiding officer on** | **:-** | 15/04/2026 |
| **Judgment uploaded on** | **:-** | 15/04/2026 |